
NEHRU BAL PUSTAKALAYA

# रेड क्रॉस



म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा. क्र. ११२५

BVBK-0401127

नेशनल बुक ट्रस्ट, इंडिया

नों. क्र. ११२५

# रेड क्रॉस

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. ११२५ दिनांक ......
विषय किशोर क्र. ६३३

कृष्ण सत्यानंद

चित्रे
सिद्धार्थ बॅनर्जी

अनुवाद
दीपक कुमार



BVBK-0401127

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली

1976 (शके 1898)

© कृष्ण सत्यानंद, 1975

RED CROSS (Marathi)
रु. 1.50

वितरक
पॉप्युलर प्रकाशन
35-सी, ताडदेव रोड, मुंबई 400034

PUBLISHED BY THE DIRECTOR, NATIONAL BOOK TRUST, INDIA, A-5 GREEN PARK, NEW DELHI-110016 AND PRINTED AT REKHA PRINTERS (P) LTD., NEW DELHI-110020. COVER AND ILLUSTRATIONS PRINTED AT THOMSON PRESS (INDIA) LTD., FARIDABAD.

# हेन्री ड्यूनान्टचे प्रारंभिक जीवन

1831 सालची गोष्ट. स्वित्झर्लंडमधली जिनिव्हा ही सुंदर नगरी. गोल चेहऱ्याचा, गुलाबी गालांचा आणि दाट रेशमी केसांचं जावळ असलेला तीन वर्षांचा एक छोटा मुलगा दिवाणखान्यातल्या एका कोपऱ्यात शांतपणे खेळत बसला होता.

ज्या खोलीत तो खेळत होता ती उंची सामानाने सजवलेली होती. त्याचे वडील व्यापारी होते. धंद्यात त्यांचा चांगला जम बसलेला होता. गावात त्यांना मानमरातब होता, प्रतिष्ठा होती. त्याच्या आईची प्रेमळपणासाठी आणि परोपकारासाठी ख्याती होती. हेन्रीच्या प्रारंभिक शिक्षणाचे श्रेय बहुतांशी तिच्याकडेच जाते.

कडाक्याच्या थंडीचा दिवस होता तो. डोक्यापासून पायांपर्यंत गरम कपडे घालून लोक रस्त्यातून जा ये करीत होते—त्यांच्या नाकांचे गुलाबी शेंडेच काय ते चकाकत होते.

जीन हेन्री ड्यूनान्ट—त्या छोटया बाळाचे हेच नाव होते. कधी आपल्या खेळण्यांशी बोलायचा तर कधी स्वतःशी. त्याची आई बाहेर जायचे कपडे घालून आणि हातात पिशवी घेऊन आली तेव्हा त्याचे लक्ष खेळातून पार उडाले. खेळ तसाच टाकून हेन्रीने तिच्याकडे धाव घेतली आणि तिच्या झग्याला धरले.

'आई, कुठं निघालीस ?' त्याने विचारले.

'अनाथाश्रमाकडे, हेन्री' तिने उत्तर दिले.

'अनाथाश्रम ?'

'हो.' तिने पुन्हा उत्तर दिले. 'गावातल्या अनाथाश्रमाकडे'

'मी पण चलणार.' हेन्रीने बाहेर जायच्या कल्पनेने आनंदून म्हटले.

'नाही, बाळ.' आईने प्रेमळपणे समजावले. 'आज खूप थंडी आहे. तू इथंच खेळत बैस. मी लवकरच परत येईन आणि मग तुला छान छान गोष्टी सांगीन हं.'

तो शांतपणे निघून गेली. हेन्री थोडा वेळ तसाच हुंदके देत उभा राहिला. त्याच्या गालांवरून अश्रू ओघळत होते. मग तो आत येऊन खिडकीपाशी गेला आणि त्याने बाहेर बघितले. त्याची आई गाडीत बसली होती. गाडीवानाला हुकूम होताच घोडे धावू लागले.

हेन्रीला फार एकाकी वाटू लागले. बराच वेळ तो खिडकीशी बसून राहिला. कधी तो खिडकीबाहेर बघायचा तर कधी खिडकीच्या तावदानांवर गोठलेल्या वाफेवर बोटांनी चित्रे काढायचा. थोडयाच वेळात तो कंटाळला. पुन्हा खेळण्यांकडे वळला. त्याला एक पिशवी मिळाली. ती त्याने उचलली आणि अनाथाश्रमाकडे जात असल्याच्या थाटात त्याने खोलीत चकरा मारल्या.

हेन्री थोडा मोठा झाला तेव्हा त्याने आपल्या आईला विचारले, 'आई, अनाथाश्रम म्हणजे काय ग ?'

आईने व्यथित स्वरात उत्तर दिले; 'ज्या मुलांना आईवडील कुणी नसतं ना त्यांना आश्रय देणाऱ्या जागेला अनाथाश्रम म्हणतात.'

अविश्वासाने मुलाचे डोळे विस्फारले. 'म्हणजे ? अशी मुलं असतात ?' त्याने विचारले. 'हो,' त्याची आई गंभीरपणे म्हणाली.' काही मुलं लहान असतानाच त्यांचे आई बाबा देवाघरी जातात. देवबाप्पा त्यांना आपल्यापाशी बोलावून घेतो आणि मग त्यांच्या लहानग्या बाळांकडे लक्ष द्यायला कुणीसुद्धा रहात नाही. या मुलांना एका घरात ठेवतात आणि

दयाळू लोक त्यांची देखभाल करतात. ते त्या मुलांना खायला देतात. कपडे देतात. झोपायला अंथरूण देतात आणि ती मुलं आजारी पडली तर त्यांची शुश्रूषादेखील करतात.'

हेन्रीच्या घरात अनाथाश्रमांविषयी, तसेच तुरुंग आणि रुग्णालयांमधील कामकाजात व वातावरणात कशी सुधारणा करावी या विषयी बरीच चर्चा होई. हेन्री जसजसा मोठा होत गेला तसतसे त्याला जाणवले की जिनिव्हाचे नागरिक आपल्या कर्तव्यांप्रती मोठे जागरूक आहेत. आपल्यापेक्षा कमनशिबी असलेल्यांना मदत कशी करता येईल याकडे ते सतत लक्ष पुरवीत असतात आणि गरजवंतांना सढळ हाताने मदत करीत असतात.

हेन्रीचे आईवडील देखील आपल्या जबाबदाऱ्यांविषयी दक्ष होते. त्याचे वडील सावकार होते आणि ते अनाथ मुलांना आसरा मिळवून द्यायच्या कामी मदत करायचे. आई गोरगरीब, रोगी आणि म्हाताऱ्या लोकांसाठी असलेल्या आश्रमाला वरेचवर भेट द्यायची आणि त्यांना अन्न व कपडे वाटायची. हेन्री मोठा होऊ लागला तसा तो देखील आई बरोबर जाऊ लागला. ती आजाऱ्यांना दिलासा कसा देते ते तो ऐकत असे. तसेच मदतीसाठी त्यांच्या नकळत ती पैसे आणि पिशवी कशी ठेवून येते ते ही तो बघत असे.

हेन्री साधारण आठ वर्षांचा असताना एकदा आईवडिलांबरोबर फ्रान्सच्या समुद्राकाठी असलेल्या टूलॉन गावी गेला होता. जहाजांवरचा माल चढवण्याच्या व उतरण्याच्या कामासाठी जिनिव्हातले कैदी इथे पाठवले जात.

या कैद्यांच्या हितसंवर्धनाकडे लक्ष देण्याची जबाबदारी हेन्रीच्या वडिलांवर होती. पायात बेडया घातलेल्या कैद्यांना ओझी वाहून नेताना बघून हेन्रीच्या पोटात गलबलले. लोक किती क्रूर आणि अमानुष असतात ! त्या रात्री त्याचा डोळयाला डोळा लागला नाही. त्याच्या कानात सारख्या बेडया खणखणत होत्या आणि तो बिछान्यात तळमळत होता. त्याच रात्री त्याने निश्चय करून टाकला की मोठे झाल्यावर या कैद्यांना मदत करण्यासाठी शक्य ते सारे प्रयत्न करायचे.

हेन्रीला वाचनाची आवड होती. क्रिमियन युद्धात जखमी झालेल्या ब्रिटिश सैनिकांच्या सेवाशुश्रूच्या कार्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी फ्लॉरेन्स नाईटिंगलने किती कष्ट उपसले आणि युरोपातील तुरूंगांमध्ये सुधारणा करण्यासाठी एलिझाबेथ फ्रायने कसा चिकाटीने प्रयत्न केला ते त्याने वाचले होते. हॅरिएट बीचर स्टो या अमेरिकन लेखिकेने लिहिलेली 'अंकल टॉम्स केबिन' ही नावाजलेली कादंबरीदेखील त्याने वाचली होती. अमेरिकेतून गुलामगिरीचे उच्चारण करण्यात या कादंबरीचा बराच मोठा वाटा होता. या तीन स्त्रियांच्या काम-गिरीपासून त्याला खूपच प्रेरणा मिळाली.

मोठा होऊन ड्यूनान्टने धर्मार्थ कार्यासाठी बराच वेळ घालवला. गरीब आणि आजारी लोकांना मदत करणाऱ्या 'लीग ऑफ आल्म्स' नावाच्या संस्थेचा तो सभासद होता. तो तुरुंगांना नियमितपणे भेट देत असे. तेथील कैद्यांना अन्न व कपडे देत असे. तो कैद्यांशी बोलायचा आणि कायद्याचे उल्लंघन करू नये ही गोष्ट त्यांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न करायचा.

या सर्व कार्यांखेरीज व्यापारधंद्याकडे देखील ड्यूनान्टचे लक्ष असे. बँकेचा कारभार शिकण्यासाठी 1849 साली त्याने जिनिव्हातील एका बँकेत प्रवेश मिळवला. ते काम त्याने इतक्या तत्परतेने शिकून घेतले की चार वर्षांनंतर पेढीच्या अल्जीरियामधल्या शाखेचा मुख्य व्यवस्थापक म्हणून तो नियुक्त झाला. नंतर ती मंडळी सोडून त्याने स्वतःचा कामधंदा सुरू केला;

ड्यूनान्ट कष्टाळू होता, हुशार होता. व्यापारात तो चांगलेच यश मिळवील अशी चिन्हे दिसत होती. त्याच्या घरच्या लोकांना आणि मित्रांना तर तो लवकरच श्रीमंत होणार याची खात्री वाटू लागली होती. त्याच्यावर विश्वसून त्याच्या वडिलांच्या कित्येक मित्रांनी त्याच्या धंद्यात आपली रक्कमही गुंतवली.


# सोल्फेरिनोची लढाई

आपल्या कामानिमित्त ड्यूनान्टला खूप प्रवास करावा लागे. अशाच एका कामासाठी 1859 सालच्या जून महिन्यात त्याला इटलीतील लोम्बार्डी येथे जावे लागले. सहल आणि काम दोन्ही हेतूंनी तो तेथे गेला होता. त्यावेळी फ्रान्सचा राजा तिसरा नेपोलियन याने सार्डिनियाच्या राजाच्या मदतीने ऑस्ट्रिया विरुद्ध युद्ध पुकारले होते. नेपोलियनची भेट घेऊन व्यापारासाठी परवानगी मिळवावी म्हणून ड्यूनान्ट आला होता.

वसंतऋतूतील ती एक रात्र होती. इटलीच्या उत्तरेकडील कॅसिग्लो दि ला पी या गावी एका अतिथीगृहात ड्यूनान्ट गाढ झोपला होता.

अचानक रात्री तीनच्या सुमारास गोळीबाराच्या आवाजाने तो दचकून जागा झाला. आवाज जवळच्या सोल्फेरिनो या चिमुकल्या गावाकडून येत होता. त्या गावची लोकवस्ती जेमतेम हजार एक असेल.

गोळीबाराचा आवाज वाढतच गेला. सोल्फेरिनोच्या लढाईला तोंड लागले होते. आता नेपोलियनच्या भेटीची आशा करण्यात अर्थ नाही हे ड्यूनान्टने ओळखले.



त्याने बिछान्यावरून ताडकन उडी मारली. कसेबसे कपडे अंगावर चढवले आणि तो सोल्फेरिनो गावाकडे घाईघाईने निघाला. लढाई जिथून स्पष्टपणे बघता येईल अशा एका विशिष्ट टेकडीवर त्याला जायचे होते. पण वाटेतला पुल उडवून टाकलेला होता. तो क्षण-भर थबकला. मग पाण्यातून धडपडत चालत त्याने पैलतीर गाठला. तेथे सामानाची एक जुनी पुराणी गाडी पडलेली होती. त्यातून तो वर टेकडीवर गेला.

टेकडीवरून आता त्याला रणांगणाचे दृश्य स्वच्छ दिसत होते. खाली मैदानात दहा मैलांच्या परिसरात, ३,००,००० माणसे समोरसमोर उभी ठाकली होती. एकीकडे फ्रेंच व सार्डिनियन सैनिक आपल्या रंगीबेरंगी गणवेषात होते तर दुसरीकडे ऑस्ट्रियन सैनिक होते. देहभान हरपून ड्युनान्ट ते दृश्य बघत कित्येक तास उभा राहिला.

अखेर पहाट झाली. सूर्याच्या किरणांनी भाले बरच्या चकाकू लागल्या. नगारे कडाडू लागले. तुताऱ्या निनादू लागल्या, बंदुकीच्या फैरी झडू लागल्या.

सारे दृश्य सैन्याच्या हालचालीने जिवंत झाले. घोडयांच्या टापांनी आणि धावणाऱ्या सैनिकांच्या पायांनी धुळीचे लोटच्या लोट आसमंतात उडाले. त्यातच भरीला बाँबगोळयांच्या धुराने एक दाट पटल निर्माण केले. पण सूर्य वर चढू लागला तसे खाली घडणाऱ्या नाटकाचे दृश्य अधूनमधून का होईना ड्युनान्टच्या नजरेस पडू लागले.

विरुद्ध पक्षाचे सैनिक रानटी पशूंप्रमाणे एकमेकांवर तुटून पडत होते. तोफगोळयांचा सतत मारा चालला होता. यातून जे बचावत होते ते संगिनीला किंवा गोळयांना बळी पडत होते. नाहीतर घोडयांच्या पायदळी वा तोफगाडयांच्या चाकाखाली चिरडले जात होते. एक माणूस मात्र निर्भयपणे रणांगणावर फिरत होता. घायाळ लोकांना दिलासा देत होता. तो होता ॲ बे ले, तिसऱ्या नेपोलियनचा पाद्री. काही बायका देखील पाण्यासाठी करुण स्वरात ओरडणाऱ्या जखमी सैनिकांना पाणी पाजीत होत्या.

ड्युनान्ट ज्या ठिकाणी उभा होता तिथून त्याला दूरवर काही काळी निशाणे फडकताना



दिसत होती. जखमी सैनिकांवर प्रथमोपचार करणारी, रणांगणावरची रुग्णालये तेथे होती. या रुग्णालयांवर कुणी गोळया झाडायच्या नाहीत असा नियम असला तरी बरेच वेळा त्यांच्यावर गोळया पडत होत्या. फार काय रुग्णवाहक गाडया आणि डॉक्टर्सदेखील त्यातून सुटले नव्हते,

पंधरा तास ती धुमश्चक्री चालली. मग आभाळ भरून आले. तोफांच्या गडगडाटाला मागे सारील असा विजांचा कडकडाट सुरू झाला. जखमींचे व मरणाऱ्यांचे विव्हळणे, किंचाळणे त्या आवाजात दबून गेले. कधीही घडले नव्हते असे तुफान सुटले आणि त्याने लढाई बंद पाडली. ऑस्ट्रियनांनी माघार घेतली. सोल्फेरिनोची लढाई संपली.

अंधार पडू लागला तशी बरेचसे अधिकारी आणि सैनिक रणांगणावर आले आणि तेथे पडलेल्या जखमी व मृत सैनिकांत आपल्या हरवलेल्या साथीदारांचा शोध करीत हिंडू लागले. नीट शोधता यावे म्हणून मदतीला त्यांनी हातात दिवे घेतले होते. एखाद्याची ओळख पटली की ते खाली गुडघ्यावर बसत आणि त्या माणसासाठी प्रार्थना करीत वा अश्रू गाळीत. जखमी मित्रांना ते रुग्णालयात घेऊन जात.

रात्री कॅसिग्लोच्या आसपासच्या टेकडया छोटया आगटयांनी फुलून गेल्या. सैनिकांनी सूप आणि कॉफी तयार केली. मग त्यांनी आपले थकलेभागले शरीर ताणून दिले, डोळे मिटले आणि ते गाढ झोपी गेले.


# पांढऱ्या पोशाखातला माणूस

दुसरा दिवस उजाडला. सूर्य वर आला आणि रणांगणावर भीषण दृश्य दिसू लागले. सर्वत्र छिन्नविच्छिन्न प्रेतांचा आणि मेलेल्या घोडयांचा खच पडला होता. शेते उध्वस्त झाली होती. फळबागा जमीनदोस्त झाल्या होत्या. कुंपणे मोडली होती. आवारांना भगदाडे पडली होती. शिरस्त्राणे, पट्टे, पत्र्याचे डबे, सामानाची पोती, बंदुका आणि काडतुसांच्या पेटया सारे इतस्तत: विखुरले होते. सोल्फेरिनोकडे जाणारा रस्ता त्यांनी भरून गेला होता.

लढाईत अपरिमित हानी झाली होती. पन्नास हजारांहून अधिक लोक फक्त पंधरा तासांच्या अवधीत मारले गेले होते. त्यात एक हजार अधिकारी देखील प्राणास मुकले होते. हजारो लोक जबर जखमी झाले होते आणि मरणाच्या दारी पडले होते.

सैन्याच्या उपमुख्याधिकाऱ्याने आणि त्याच्या सहाय्यकाने जखमी लोकांना स्ट्रेचर वरून किंवा खेचरांच्या पाठीशी बांधलेल्या खुर्च्यांवरून रणांगणाजवळच्या रुग्णालयात हल-विण्याचा सपाटा चालवला होता. तेथून मग त्यांची रवानगी जवळच्या गावी करण्यात येई.

दुपारपर्यंत कॅसिग्लो गाव जवळ जवळ सहा हजार भयंकर जखमी सैनिकांनी भरून



गेले. प्रत्येक चर्च, शाळा, घर, सार्वजनिक चौक, न्यायालय, रस्ता व गल्लीचे तात्पुरत्या रुग्णालयात रूपांतर झाले होते.

आणि तरीही जखमी सैनिकांना आणणाऱ्या गाडया येऊन थडकतच होत्या. स्थानीय अधिकाऱ्यांना परिस्थितीवर ताबा मिळवणे कठीण जात होते. जखमींसाठी त्यांच्यापाशा अंथरूणे नव्हती. लोक सढळ हाताने मदत देत होते. अन्न, पाणी व कापसाची कमतरता नव्हती, तरी पण त्यांचे वितरण करण्यासाठी पुरेसे लोक नव्हते. सन्याचे बरेचसे डॉक्टर कॅवरिआना या जवळच्या दुसऱ्या शहरी होते. वैद्यकीय ज्ञान असलेले मदतनीस शिपाई देखाल फार कमी होते. त्यामुळे सर्वत्र नुसता गोंधळ माजला होता. जखमी सैनिक वेदनांनी तडफडत होते, किंचाळत होते.

सुरुवातीला ड्यूनान्ट हे सारे असहाय्यपणे नुसते बघत राहिला. पण त्या धक्क्यातून आणि क्रोधातून थोडयाच वेळात तो सावरला. घायाळ लोकांना असे मरू





देता उपयोगाचे नाही, तो स्वत:शीच पुटपुटला. स्वयंसेवकांच्या मदतीची लगेच व्यवस्था करायला हवी.

जवळपासची रुग्णालये भरून गेली आहेत आणि त्यांच्याकडून मदतीची अपेक्षा करणे व्यर्थ असल्याचे ड्यूनान्टला माहीत होते. म्हणून मिळतील तेवढया मुलकी डॉक्टरांना आणि स्वयंसेवकांना त्याने जमवले आणि त्या सर्वांना कॅसिग्लोच्या चर्चमध्ये नेऊन त्याने कामाला सुरुवात केली.

तहानेल्यांची तहान भागवण्यासाठी झऱ्यांवरून व शेतांवरून पाणी आणण्यात आले. जमिनींचा केर काढून त्या धुण्यात आल्या. लहान लहान पोरे सूप गोळा करण्यासाठी दारोदारी गेली. बायका साबण, कापड, स्पंज वगैरे घेऊन आल्या. जवळच्या ब्रेशिया गावातून तंबाखू, लिंबे आणि संत्री आणण्यासाठी ड्यूनान्टने आपल्या गाडीवानाला पिटाळले. जखमा धुवून त्यांवर मलमपट्टी करण्यात आली. चिरूट भरण्यात आले आणि ताजेतवाने करणाऱ्या लिंबाच्या सरबताचे ग्लास सर्वांना देण्यात आले.

तासन तास निरलमपणे ड्यूनान्ट काम करीत होता. त्याचा पांढरा स्वच्छ उन्हाळी पोशाख रक्ताने माखून गेला. जखमींच्या कण्हण्याकुंथण्याने त्याचे कान किटून गेले. पण थोडयाच वेळात सर्व जखमींची सोय लागली. गवती बिछान्यावर त्यांना ओळीने निजवण्यात आले. त्यामुळे मेणबत्तीच्या प्रकाशातसुद्धा डॉक्टरांना काम करणे सुलभ झाले. ड्यूनान्ट त्या ओळींमधून पाणी देत आणि सहानुभूतीचे शब्द बोलत हिंडत होता आणि जखमा बांधीत होता. सैनिकांनी त्याला नाव दिले, 'पांढऱ्या पोशाखातला माणूस.'

दरम्यान आणखी स्वयंसेवक पुढे आले. नौदलातील एक सेवानिवृत्त अधिकारी आणि काही इंग्रज प्रवासी उत्सुकतेने चर्च पहायला आले होते. मदतीसाठी थांबण्याकरता त्यांचे मन वळविण्यात आले. स्वित्झर्लंडचा एक व्यापारी दोन दिवसांकरता आला होता. मरणाऱ्या लोकांच्या घरी पत्रे लिहिण्याचे काम करण्यात त्याने आपला वेळ घालवला.

बहुतेक स्त्री स्वयंसेवकांना कामाचा सराव नव्हता. तरी त्यांच्या गोड बोलण्याने आणि देखरेखीने तळमळणाऱ्या सैनिकांना दिलासा मिळत होता. पण मित्र समजल्या जाणाऱ्या फ्रेंच आणि सार्डिनियन सैनिकांकडेच फक्त त्या लक्ष पुरवीत होत्या. ऑस्ट्रियन सैनिकांना मात्र त्या तसेच खितपत पडू देत होत्या. ड्यूनान्ट प्रत्येकाकडे मानवतावादी नजरेने पहात असे. तो सर्वांकडे सारखेच लक्ष देई.

एका ऑस्ट्रियन सैनिकाला आराम देण्यासाठी तो त्याच्यावर वाकला असताना एक शेतकरी बाई उद्गारली, 'अहो, तो आपला शत्रू आहे.' ड्यूनान्ट ताठ उभा राहिला. त्या बाईच्या खांद्यावर हात ठेवून तिच्या नजरेला नजर भिडवीत संयपणे त्याने म्हटले, 'शत्रू देखील माणूसच असतो.'







ड्यूनान्टने ज्या अविर्भावात हे शब्द उच्चारले त्याचा त्या बाईवर आणि तेथे असलेल्या सर्व स्वयंसेवकांवर इतका विलक्षण परिणाम झाला की त्यांचा दृष्टिकोनच पालटला. ते सर्व ड्यूनान्टचा कित्ता गिरवू लागले. ऑस्ट्रियनांनाही पाणी देण्यात आले. त्यांच्या तप्त कपाळांवर थंड पाण्याच्या घडया ठेवण्यात आल्या. 'तूती फातेली ! तूती फातेली !' एक बाई ओरडली. 'ते आमचे भाऊ आहेत!' सर्वांनी आरोळया ठोकल्या. तो संदेश कितीतरी वेळ त्या चर्चमध्ये घुमत होता.

पण काही काळानंतर स्वयंसेवकांचा तो उत्साह उतरणीस लागला. एका पाठोपाठ एक ते काम सोडून जाऊ लागले. रोग्यांच्या यातनांचा त्यांच्या मनावर परिणाम होऊ लागला होता. त्यांना उदास वाटू लागले होते. शिवाय घरी देखील त्यांची गरज होती आणि काही सैनिकांना तर बरे व्हायला खूपच उशीर लागणार होता.

जसजसे दिवस सरू लागले, कित्येक सैनिक मरण पावले. बाकीच्यांना मोठया शहरातील रुग्णालयांत हलविण्यात आले. शत्रूपक्षाच्या ज्या डॉक्टरांना पकडले होते त्यांना निष्पक्ष मानून सोडून देण्यात यावे अशी विनंती ड्यूनान्टने केली. नेपोलियनने ती मान्य केली आणि ऑस्ट्रियन लोकांना त्यांचे डॉक्टर परत मिळाले. अजूनही गाडया भरभरून जखमी लोक येत असले तरी हळूहळू सुव्यवस्था प्रस्थापित झाली होती आणि शहरातील नित्याचे व्यवहार सुरळित होऊ लागले होते. लवकरच ड्यूनान्ट जिनिव्हाला परतण्याचा बेत करू लागला.

म. ग्रं. स. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. ११२५ दिनांक ........
विषय ...किशोर... क्र. ६.२३

# रेड क्रॉसचा जन्म

इयूनान्ट जेव्हा इटलीच्या प्रवासाहून परत आला तेव्हा तो पार बदलून गेला होता. कॅसिग्लोला पाहिलेला भयंकर प्रकार तो विसरू शकत नव्हता. रणांगणावरचे ते भीषण दृश्य रात्रंदिवस त्याचा पाठपुरावा करीत होते. फार काय आपला कामधंदा त्याला निरर्थक वाटू लागला व कामातून त्याचे चित्त उडाले.

अल्जीरियाला त्याला पवनचक्क्या निर्यात करावयाच्या होत्या आणि त्यासाठी परवाना घेण्याकरिता तो तिसऱ्या नेपोलियनच्या भेटीला गेला होता हे देखील तो विसरून गेला. त्याच्या उद्योगधंद्यात भांडवल गुंतवून त्याच्या वडिलांच्या मित्रांनी त्याच्यावर जो विश्वास दाखवला होता त्याचा देखील त्याला विसर पडला. तो सतत विचारात दंग राहू लागला. त्याने स्वतःच्या डोळ्यांनी ज्या यातना, जे दुःख पाहिले होते ते विसरणे कसे शक्य होते ?


त्याला खात्री वाटत होती की आपल्या हाताखाली जर अनुभवी आणि प्रशिक्षित असे शंभर स्वयंसेवक शिपाई व परिचारिका असत्या तर कॅसिग्लो येथील परिस्थितीचा घातकपणा कितीतरी कमी झाला असता. जखमींची काळजी घेण्याकरता संघटित केलेल्या

बऱ्याच लोकांचे एक मोठे पथक उभारता आले असते सद्य: परिस्थितीत लोकांचा बराचसा उत्साह वाया गेला होता. कित्येक संपन्न नागरिकांनी आणलेल्या खाद्यवस्तूंच्या भेटी, ते पदार्थ जखमींना खाण्यासाठी देता येत नाहीत म्हणून परत कराव्या लागल्या होत्या. त्यांना जर आगाऊ सूचना देता आली असती तर त्यांच्या सदिच्छा आणि उत्साहाचा अधिक चांगला उपयोग करून घेता आला असता. अनेक लोकांचे प्राण वाचवता आले असते. डॉक्टरांना जर पकडण्यात आले नसते आणि रुग्णालयाना संरक्षण दिलेले असते तर वैद्यकीय मदत अधिक सुलभतेने उपलब्ध होऊ शकली असती.

ड्युनान्ट जसजसा या गोष्टीवर अधिकाधिक विचार करू लागला एक योजना त्याच्या मनात आकार घेऊ लागली. आपली कल्पना कागदावर उतरविण्याचे आणि युरोपातील विचारवंतांचे त्याकडे लक्ष जावे म्हणून पुस्तकरूपाने ती प्रसिद्ध करण्याचे त्याने ठरवले. अन्य शोधकांनी देखील आपल्या कल्पनांचा प्रसार होऊन, यश मिळावे म्हणून अगोदर पुस्तकेच लिहिली होती. तो देखील तेच करणार होता.

'सूव्हेनियर ऑफ सोल्फेरिनो' या पुस्तकात त्याने सोल्फेरिनोच्या युद्धाचे आणि त्याच्या भीषण परिणामांचे तंतोतंत वर्णन केले. त्या दारुण परिस्थितीतून मार्ग काढण्याचे उपाय देखील त्याने सांगितले. त्याने सुचविले की मदतीचे कार्य करतील अशा ऐच्छिक संस्था प्रत्येक देशात स्थापन करण्यात याव्यात. युद्धाच्या वेळी हाक मारताच या संस्थांनी ओ द्यावी आणि वर्ग, धर्म वा वंश याकडे लक्ष न देता जखमींसाठी मदतीचा हात पुढे करावा. जखमींना संरक्षण मिळावे यासाठी एक आंतरराष्ट्रीय करार करण्यात यावा असेही त्याने प्रतिपादन केले.

'सूव्हेनियर ऑफ सोल्फेरिनो' पुस्तक फ्रेंच भाषेत लिहिले होते. ते पुरे व्हायला बारा महिने लागले. 1862 साली ते प्रसिद्ध झाले. युद्धातील अमानुषतेविरुद्ध दावा पुकारण्याची त्यात कळकळीची विनंती केली होती. युद्धाविषयीच्या आजवरच्या सर्व पुस्तकांत ते अजूनही सर्वात जास्त हुबेहूब आणि हृदयस्पर्शी माहिती देणारे पुस्तक आहे.



गुस्ताव्ह मोनियर

हे पुस्तक प्रसिद्ध होताच युरोपात आपल्या मताचा प्रसार करण्याची अविश्रान्त मोहीम ड्यूनान्टने सुरू केली. युरोपातील प्रत्येक शहरात त्याने पुस्तकाच्या शेकडो प्रती वाटल्या. त्या कार्याकरिता मग त्याने पैशांकडे बघितले नाही की कामधंद्याची पर्वा केली नाही. तो मोठा ध्येयवेडा माणूस होता.

'सूव्हेनियर ऑफ सोल्फेरिनो' हे मोठे मर्मस्पर्शी आणि परिणामकारक पुस्तक होते. ज्या लोकांनी ते वाचले त्या सर्वांना युद्धाच्या भयंकरपणाची जाणीव तर झालीच पण त्याच बरोबर जखमींना मदत करणाऱ्या लोकांची किती कमतरता आहे आणि ही गोष्ट किती दयनीय आहे हे देखील जाणवले. ड्यूनान्टच्या सूचनांना प्रचंड प्रतिसाद मिळाला.

1860 च्या सुमारास मानवजातीकडे पाहण्याचा एक नवा सहृदय दृष्टिकोन युरोपात उदयास आला होता. त्यास युद्धाच्या भीषण परिणामांची व लोकांच्या दु:खाची जाणीव होती.

फार काय राज्यकर्त्यांना देखील मनुष्यबळ आणि पैसा या दृष्टींनी युद्धात किती अपरंपार हानी होते, लोकांना किती कष्ट झेलावे लागतात याची जाणीव होऊ लागली होती. आधुनिक शस्त्रास्त्रे किती अमर्याद नुकसान करू शकतात हे त्यांनी पाहिले होते. पंधरा तासात पन्नास हजार सैनिकांचा बळी सोल्फेरिनो येथे पडला होता त्यावरून हेच सिद्ध झाले होते. लोक युद्धाला कंटाळले होते. नेपोलियनच्या लढाया दहा वर्षे चालल्या होत्या. क्रिमियन युद्ध तीन वर्षे चालले होते. प्रत्येक घरातील कर्ते पुरुष व तरुण मुले ठार तरी झाली होती नाहीतरी जखमी तरी झाली होती.

म्हणून प्रत्येकजण ड्यूनान्टच्या मताकडे झुकला होता. ड्यूनान्टच्या पुस्तकाचा परिणाम झालेल्या लोकांमध्येच गुस्ताव्ह मोनियर हा देखील होता. तो विख्यात वकील व परोपकारवादी होता. मुख्यत: त्याच्यामुळेच ड्यूनान्टचे स्वप्न प्रत्यक्षात आकार घेऊ लागले. मोनियर हा जिनिव्हा सार्वजनिक कल्याण समितीचा अध्यक्ष होता. इतकेच नव्हे तर त्याचा मोठा दबदबा होता आणि संघटना करण्याची कार्यकुशलता त्याच्या अंगी होती.



जनरल गिलॉम डयूफोर



डॉ, लुई अप्पिया



डॉ. थिओडोर मॉनोअर

1863 साली जेव्हा जिनिव्हा सार्वजनिक कल्याण समितीची बैठक भरली तेव्हा ड्यूनान्टच्या सूचनांवर भरपूर साधकबाधक चर्चा झाली. ड्यूनान्टने सुचविलेल्या पद्धतीच्या सहाय्यक समित्या स्थापन करण्यासाठी एक कमिटी तयार करण्यात आली. स्विस सैन्याचा अतिशय आदरणीय कमांडर जनरल गिलॉम ड्यूफोर हा कमिटीचा अध्यक्ष होता. दुसरे दोन सभासद लुई अप्पिया आणि थिओडोर मॉनोअर हे डॉक्टर होते. मोनियर हा चवथा सभासद होता आणि पाचवा ड्यूनान्ट हा सचिव म्हणून कार्य पहात होता.


ड्यूनान्टच्या सूचनांचा विचार करण्यासाठी एक बैठक बोलावण्यात आली. त्यासाठी प्रतिनिधी धाडण्याची विनंती युरोपातील सर्व राज्य सरकारांना करण्यात आली. एका छोटया देशातील पाच लोकांनी हे मोठे धाडणी पाऊल उचलले होते. तरीखेखील 26 ऑक्टोबर 1863 रोजी भरलेल्या बैठकीस चौदा राज्यांनी छत्तीस प्रतिनिधी धाडले.

त्या अगोदरच आठ महिने ड्यूनान्टने युरोपातील राजधान्यांना भेटी देऊन या बैठकीसाठी पाठिंबा मिळवला होता आणि प्रतिनिधींना बैठकीस हजर राहण्याचे आमंत्रण दिले होते. त्याने सुचविलेला आंतरराष्ट्रीय करार पूर्वी कुणीही सुचवला नव्हता. दरम्यानच्या काळात कमिटीचे अन्य सदस्य ठराव आणि शिफारसी यांचा मसुदा तयार करण्याच्या कार्यात गुंतले होते.

8 ऑगस्ट 1864 रोजी दुसरी बैठक भरवण्यात आली. ती स्विस फेडरल सरकारने बोलावली होती. बैठकीला युरोपातील पंधरा राज्यांनी आपले प्रतिनिधी पाठवले होते. दोन दिवसाच्या चर्चेनंतर पहिल्या जिनिव्हा परिषदेची आखणी करण्यात आली. दहा मुख्य मुद्दे मांडण्यात आले. त्यापैकी विशेष महत्त्वाचे होते: परिषदेत ठरावाला मंजुरी देणाऱ्या राज्यांवर यापुढे युद्धाच्या वेळी आहत व रुग्ण सैनिकांची देखभाल करण्याचे बंधन राहील. घायाळांकडे लक्ष पुरविणाऱ्यांना संरक्षण देण्यात येईल. रुग्णालये, रुग्णालयातील उपकरणे आणि रुग्णवाहक गाडया यांच्यावर हल्ला चढवता येणार नाही आणि शक्य असेल तेव्हा कैद्यांची अदलाबदल करता येईल. याशिवाय निष्पक्षपणाचें प्रतीक म्हणून एका पांढऱ्या पार्श्वभूमीवर

लाल रंगाची फुली हे चिन्ह स्वीकारण्याचे मान्य करण्यात आले. हे चिन्ह सहज ओळखता येण्याजोगे होते आणि त्यामुळे डॉक्टर व परिचारिका यांना रणागणावर जखमी लोकांपाशी पोचण्यास मदत होणार होती. पाच जणांच्या कमिटीत जे दोन डॉक्टर होते त्यांच्यापैकी लुई अप्पिया हा रेडक्रॉसचे चिन्ह धारण करणारा पहिला मानकरी होय.

युद्धाच्या वेळी आजारी आणि जखमी लोकांना मदत करतील अशी स्वयंसेवक दले उभारण्यासाठी परिषदेस हजर असलेल्या सर्व राष्ट्रांना सांगण्यात आले. ही दले म्हणजेच आजच्या रेड क्रॉस सोसायटयांचे पूर्ववर्ती रूप होय.







22 ऑगस्ट 1864 ला पंधरा देशांच्या प्रतिनिधींनी या परिषदेच्या ठरावा-वर सह्या केल्या. जगाच्या दृष्टीने तो एक अतिशय महत्त्वाचा दिवस होता. कारण त्या दिवसापासून रणांगणावर कुणीही वैद्यकीय मदतीशिवाय मरेनासे झाले आणि युद्धकैद्यांना ठार करण्याचे रद्द झाले.



# युद्धाच्या धुमश्चक्रीत परोपकार

1864 च्या करारानंतर अनेक देशांनी आपल्या स्थानीय रेड क्रॉस सोसायटया स्थापन केल्या. जिनिव्हा परिषदेनंतरही युरोपात युद्धे काही संपली नव्हती. म्हणून या सोसायटयांना बरेच काम करायचे होते. विभिन्न राज्यांमध्ये आपसात कुरबुरी चालूच असत. परिणामी सशस्त्र चकमकी होत असत. 1870-71 मध्ये झालेल्या फ्रँको-प्रशियन युद्धात रेड क्रॉसने पहिली महत्त्वाची कामगिरी बजावली. रेड क्रॉसच्या कार्यकर्त्यांनी 5,000,000 रुग्ण आणि घायाळ लोकांची देखभाल केली. रेड क्रॉसची लाल फुली असलेला पांढरा झेंडा वाऱ्यावर फडकत रक्षणकर्त्या शक्तीच्या रूपात सर्वांपाशी धावून गेला. मग तो माणूस कोणत्या का देशाचा वा वंशाचा असेना.

सुरुवातीच्या काळात रेड क्रॉस हा जखमी सैनिकांच्या कल्याण समितीच्या रूपात ओळखला जाई. 1867 साली नेदर्लंडने औपचारिकरीत्या मान्यता दिल्यानंतरच त्यास रेड क्रॉस सोसायटी हे नामाभिधान मिळाले. त्याचे ब्रीद आहे 'इंतर आर्मा कॅरिताज.' लॅटिन मधील या शब्दसमूहाचा अर्थ आहे. 'युद्धाच्या धुमश्चक्रीत परोपकार.'


रेड क्रॉसची ख्याती दूरदूरवर पसरली. फार काय बोअर युद्धात (1899-1902) गांधीजींनी देखील एक उत्साही स्वयंसेवकाच्या रूपात काम केले होते. शिसपेन्सिलीने रेखाटलेले त्यांचे एक रेखाचित्रही आहे. त्यात ते स्ट्रेचर घेऊन जाणाऱ्या माणसाच्या गणवेषात असून रेडक्रॉसचा पट्टा त्यांच्या दंडावर बांधलेला आहे व डोक्यावर सैन्याचे शिरस्त्राण घातलेले आहे. त्यावेळी ते सदतीस वर्षांचे होते आणि दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांचे मान्यवर पुढारी होते. 1907 च्या दुसऱ्या जिनिव्हा परिषदेने कार्याची व्याप्ती आणखी वाढवली. सागरी युद्धात जखमी होणाऱ्यांनाही मदत देण्याचे ठरविण्यात आले. प्रत्येक नव्या युद्धाबरोबर रेड क्रॉसचे कार्यही वाढत गेले.

युद्धाने असंख्य समस्या निर्माण केल्या होत्या. जखमी लोकांची व्यथा सुसह्य करणे एवढे एकच कार्य काही नव्हते. युद्धकैद्यांचा प्रश्नही विचारात घ्यायला हवा होता.

रेड क्रॉस अस्तित्वात येण्यापूर्वी युद्धकैद्यांना फार वाईट वागणून दिली जाई. कधी कधी तर त्यांना ठार करण्यात येई. त्यांच्या घरच्यांना त्यांचा ठावठिकाणा कळण्याची काहीच सोय नव्हती. आपल्या सैनिक पतीच्या खुशालीच्या बातमीसाठी बायका आणि मुलाच्या बातमीसाठी माता तळमळत असत. त्यांच्या जिवाभावाच्या लोकांचे काय झाले हे त्यांना सांगणारे कुणीच नव्हते. रेड क्रॉसने ही जबाबदारी अंगावर घेतली. निष्पक्ष असल्याने लढाईत उभयपक्षी त्याला मान होता. पहिल्या जागतिक महायुद्धाच्या प्रसंगी त्याने युद्धकैद्यांची माहिती पुरविणारे एक केंद्र चालू केले आणि तेव्हापासून आजवर त्यांचे हे युद्धकैद्यांची माहिती देण्याचे कार्य चालू आहे.

काळजी वाटणाऱ्या नातेवाईकांच्या प्रश्नांना उत्तरे देण्याचे कार्य मोठे कठिण आणि कंटाळवाणे होते. एखाद्या माणसाचा ठावठिकाणा आणि परिस्थिती यांचा पत्ता लावण्यासाठी पत्रांवर पत्रे लिहावी लागत. एखादा माणूस बेपत्ता असल्याचे समजले तर माहिती केंद्रावरील स्वयंसेवक बहुधा माहिती मिळवण्याच्या आशेने त्या माणसाच्या तुकडीतील निदान दहा ते पंधरा लोकांना तरी पत्रे लिहीत. कधी कधी त्यांचे प्रयत्न फोल ठरत. पण बहुतेक वेळा







त्यांच्या पत्रांना योग्य तो प्रतिसाद मिळे आणि बेपत्ता म्हणून सोडून दिलेल्या सैनिकाचा पत्ता लागून त्याची बातमी त्याच्या घरी कळविण्यात येई.

हे काम करणाऱ्यांमध्ये विख्यात फ्रेंच लेखक रोमा रोलाँ हे देखील होते. गांधीजींचे ते घनिष्ट मित्र होते. पहिल्या जागतिक महायुद्धाच्या वेळी ते रोज रेड क्रॉसच्या कार्यालयात जाऊन बसत आणि हे कारकुनी काम आनंदाने करीत.

पहिल्या जागतिक महायुद्धा इतके भयंकर युद्ध जगाने त्यापूर्वी कधीच पाहिले नव्हते. पूर्वीच्या युद्धांप्रमाणे दोन व तीन देशांपुरतेच ते मर्यादित नव्हते. तर अनेक देशांना त्याची झळ लागली होती. लाखो सैनिक त्यात गुरफटले होते आणि जखमी व मरणाऱ्या सैनिकांना मदत करण्यासाठी लाखो स्वयंसेवक संकटांची तमा न बाळगता अहोरात्र खपत होते.

युद्धाच्या दरम्यान, या स्वयंसेवकांनी केलेल्या कार्याचा गौरव करण्यासाठी 1917 साली रेड क्रॉसच्या आंतरराष्ट्रीय कमिटीला नोबेल पारितोषिक देण्यात आले. एकोणिसाव्या शतकातील 'डायनामाइट किंग' (स्फोटक द्रव्यांचा राजा) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आल्फ्रेड नोबेल यांनी शांततेसाठी हे नोबेल पारितोषिक ठेवले होते. नोबेल हे कोटयाधीश होते आणि शस्त्रास्त्रे तयार करून त्यांनी अफाट संपत्ती मिळवली होती. आयुष्याच्या अखेरीस त्यांना उपरती झाली. ज्या मार्गाने त्यांनी पैसा मिळवला होता त्याबद्दल त्यांना अपराधीपणा वाटू लागला होता. पश्चात्ताप होऊन त्यांनी ती संपती दान करून टाकली आणि शांततेसाठी प्रयत्न करणाऱ्यांचा गौरव करण्याकरिता एक पारितोषिक नेमून टाकले.

प्रचंडपणाच्या बाबतीत दुसऱ्या जागतिक महायुद्धाने तर पहिल्या महायुद्धावरही वरताण केली. रेड क्रॉसने 450,000 टन सामान मदतीसाठी गोळा केले आणि निव्वळ युद्धकैद्यांच्या माहिती केंद्रासाठी 13,000,000 हून अधिक डॉलर्स खर्च केले. त्याचे प्रतिनिधी युद्धकैद्यांच्या तळावर जात आणि कैद्यांना मिळणाऱ्या वर्तणुकीत व त्यांच्या राहण्याच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करीत.

रेड क्रॉसच्या आंतरराष्ट्रीय कमिटीने 1939 साली मध्यवर्ती युद्धकैदी कार्यालय उघडले. लाखो कैद्यांची व स्थानबद्ध लोकांची तपशीलवार माहितीपत्रे या कमिटीच्या कार्यकारी लोकांनी तयार करून ठेवली. युद्धकैद्यांची अदलाबदल करण्यात त्यांनी मदत केली आणि आवश्यक त्या समानाचा पुरवठाही केला.

प्रवास करणाऱ्या सैनिकांसाठी रेड क्रॉसच्या कार्यकर्त्यांनी जागोजागी रेल्वे प्लॅटफार्म्सवर उपाहारगृहे चालविली आणि युद्धाने त्रस्त झालेल्यांसाठी मनोरंजन केंद्रेही उघडली. सेना जेव्हा एखाद्या विशिष्ट परिस्थितीचा मुकाबला करू शकत नसे तेव्हा रेड क्रॉस पुढे सरसावून मदतीचे व पुनर्वसनाचे कार्य करीत असे. रेड क्रॉसने बरीच वर्षे जगभर हे कार्य केले. युद्ध संपल्यावरही हे कार्य चालू ठेवले.

युद्धे थांबवणे रेड क्रॉसला कदाचित शक्य होणार नाही. पण जोवर युद्धे आहेत तोवर शत्रू देखील माणूसच असतो आणि म्हणून त्याचाही मान ठेवला पाहिजे याचे स्मरण ते देत राहील. रेड क्रॉसमुळेच युद्धाच्या धुमश्चक्रीत देखील दयाभाव सतत अस्तित्वात राहील.

# आपद्ग्रस्तांच्या मदत योजनेंची जन्मदात्री

अमेरिकेतील डॅन्सव्हिले नावाचे एक छोटे गाव. 1884 साल. अमेरिकन रेड क्रॉसची स्थापना करणारी क्लॅरा बार्टन आपल्या घराच्या दिवाणखान्यातील एका खुर्चीवर बसली होती. अधून मधून रूपेरी छटा असलेला भुऱ्या रंगाचा विपुल केशसंभार तिच्या राकट चेहेऱ्याभोवती शोभून दिसत होता. साठ वर्षांची अखंड धडपड तिच्या पाठीशी होती.

क्लॅरा बार्टन मोठी चिंताक्रान्त दिसत होती. बहुतेक सर्व वर्तमानपत्रांतून भीषण वणव्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. मिचिगनच्या दुष्काळग्रस्त भागातील शेतांतून व रानातून लागलेली आग कित्येक दिवस सारखी धुमसत होती. सारा आसमंत बेचिराख करीत होती. त्यातच भरीला सोसाटयाचा वारा आग फुलवीत होता. आगीने रौद्ररूप धारण करून अमेरिकेतील 1,800 चौरस मैलाचा प्रदेश गिळंकृत केला होता. हजारो लोक घरदार सोडून पळत होते. झाडामागून झाडे जळून राख होत होती. आगीची धग इतकी तीव्र होती की पक्षीसुद्धा होरपळून टपाटप खाली जमिनीवर पडत होते. मासे पाण्यातच तडफडून मेले होते आणि कित्येक मैल दूर असणाऱ्या फळबागा अकालीच मोहोरल्या होत्या.



क्लैरा बार्टन

क्लॅरा बार्टनचे वय झाले असले तरी या संकटग्रस्त लोकांना मदत करण्याचा निश्चय तिने केला. अमेरिकेच्या यादवी युद्धाच्या वेळी तिने याहून कठीण प्रसंगाला तोंड दिले होते आणि आत्मविश्वासात्मक अनुभव तिच्या जमेला होता. डॅन्सव्हिले गावातील आपल्या घरावर तिने रेड क्रॉसचा एक ध्वज लावला आणि तातडीच्या मदतीसाठी हाक दिली. आगीच्या धुमाकुळाचे जिवंत चित्र, डोळ्यापुढे उभे करणारे वर्णन तिने वर्तमानपत्रांतून लिहिले : 'आगीच्या मार्गात एखाद्या ससाला पुरेल इतकेही अन्न उरलेले नाही आणि असते तरी ते खाण्यासाठी ससे नाहीत.'

ते हृदयस्पर्शी वर्णन लोकांच्या मनाला जाऊन भिडले आणि आगीची झळ लागलेल्या लोकांसाठी मदतीचा ओघ [illegible] सर्व ठिकाणाहून वाहू लागला. अन्नधान्य, कपडे आणि औषधे येऊन धडकू लागली. जे लोक आगीतून बचावले होते ते भयंकर गोंधळून गेले होते. त्यांना जेवणखाण आणि निवारा दिला गेला. मोडतोड झालेल्या घरांची डागडुजी करण्यासाठी आणि नवीन घरे बांधण्यासाठी लाकूड व हत्यारे पुरवण्यात आली.

आगीचा विसर पडतो न पडतो तोच पुराने हाहाकार उडवला. डोंगरावर वितळलेल्या बर्फाने ओहायो नदीला प्रचंड पूर आला. ती दुथडी भरून वाहू लागली. क्लॅरा बार्टन जेव्हा सिनसिनाटीमध्ये आली तेव्हा तिला सारे शहर पाण्याखाली दिसले. गावातील लोक घराच्या छतांवर अडकून पडले होते. तरी पावसाला खीळ नव्हती. परिस्थिती आणखी बिघडून टाकण्यासाठी म्हणून की काय भरीला चक्री वादळ झाले. घरे व झाडे उखडली गेली. कापसाची व उसाची हजारो एकर शेती पाण्याखाली गेली. घरे भुताटकीच्या जहाजांसारखी पाण्यात तरंगू लागली. रोरावणाऱ्या प्रवाहाने माणसांना व प्राण्यांना वाहून नेले.

क्लॅरा बार्टनने लगेच जोश व्ही. थूप नावाचे एक जहाज ठरवले. मोजकी माणसे आणि कपडयांचा व जळणाचा भरपूर साठा घेऊन ती आपल्या परोपकाराच्या कामगिरीवर


निघाली. जोश व्ही. थूप हे अमेरिकन पाण्यातून जाणारे रेड क्रॉसचे पहिले सहाय्यकारी जहाज होते.

नदीतून प्रवास करीत प्रत्येक खेडयाला भेट देत, ज्या ज्या ठिकाणी लोक आढळले त्या त्या ठिकाणी जळण व इतर आवश्यक सामान देत ते पुढे जात राहिले. प्रत्येक ठिकाणी क्लॅरा काही लोकांना जहाजावर बोलावायची, त्यांना काय हवे याचा अंदाज घ्यायची, सामान घेण्यासाठी व वितरण करण्यासाठी एक कमिटी नेमायची आणि तिला त्यांच्याकरता पुरेशी वाटेल इतकी रक्कम वाटून द्यायची. ती कोण, आणि रेड क्रॉसचा तो विलक्षण ध्वज कशासाठी आहे या विचाराने लोक गोंधळून तिच्याकडे पहात असतानाच ती त्वरित पुढे निघूनही जायची.

अमेरिकेतील रेड क्रॉसची संस्थापिका क्लॅरा बार्टन ही न्यू इंग्लंडमधल्या एका शाळेत शिक्षिका होती. अमेरिकन यादवी युद्धाच्या वेळी ती आघाडीवरची स्वयंसेविका झाली. ती इतकी लोकप्रिय झाली की लोक तिला 'दयेची देवी' म्हणू लागले. नंतर ती युरोपात गेली आणि तेथे तिने भरपूर मदत कार्य केले. तेथेच तिला पहिल्यांदा रेड क्रास-विषयी समजले. तेथून ती अमेरिकेला परतली ते मनाशी ठाम निश्चय करूनच की जिनिव्हा परिषदेसाठी सरकारची मंजुरी मिळवायची आणि रेड क्रॉसच्या चळवळीला पाठिंबा द्यायचा. तिच्या प्रयत्नाला यश येऊन 1882 च्या जिनिव्हा परिषदेच्या अटी अमेरिकन सरकारने मान्य केल्या. अमेरिकन रेड क्रॉसची ती पहिली अध्यक्ष झाली.

क्लॅरा करीत असलेल्या पद्धतीच्या मदतकार्याची गरज हेन्री ड्यूनान्टने देखील पुढे मांडली होतीच. पण तिच्या घरावरच्या रेड क्रॉसच्या ध्वजाने तातडीच्या मदतीची हाक देईपर्यंत रेड क्रॉस फक्त युद्धग्रस्तांनाच सहाय्य करीत होते. युद्धाला बळी पडणाऱ्यांपेक्षा देखील नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, प्लेग वगैरेंना बळी पडणाऱ्यांची संख्या कितीतरी मोठी असते आणि त्यांनाही मदतीची अत्यंत आवश्यकता असते हे तिनेच पहिल्यांदा ओळखले.





अमेरिका आणि इतरत्रही असलेल्या रेड क्रॉसच्या पथकांना शांततेच्या काळात विविध प्रकारचे बचावकार्य करण्याची प्रेरणा तिनेच दिली.

क्लॅरा बार्टनच्या उदाहरणामुळेच रेड क्रॉसचे कार्यकर्ते नैसर्गिक आपत्ती, रोगांच्या साथी, इतकेच नव्हे तर घरे कोसळण्याच्या बातम्यांप्रति देखील सदैव जागरूक असतात. अन्नसामग्री आणि औषधे यांची जय्यत तयारी ठेवून मदतीचा हात देण्यासाठी ते नेहमीच तत्पर असतात.

मोठया प्रमाणावरील नैसर्गिक आपत्तींच्या प्रसंगी जगाच्या विभिन्न भागातील रेड क्रॉस सोसायटया सहकार्यासाठी परस्परांना आवाहन करतात. कारण रेड क्रॉस हे 114 विभिन्न देशांतील राष्ट्रीय रेड क्रॉस सोसायटया मिळून बनलेल्या एका विशाल कुटुंबासारखे आहे. ज्यावेळी स्थानीय संस्था परिस्थितींशी मुकाबला करू शकत नाहीत त्यावेळी एक-मेकांना स्वेच्छेने मदत करणारे असे 230,000,000 सभासद 1974 साली यात होते. त्यांनी तात्पुरते दवाखाने व छावण्या उभारल्या, विस्थापितांसाठी घरे बांधली आणि लाखो निर्वासि-तांना प्रतिबंधक लस टोचली, 1971 साली बांगला देशला त्यांनी 300,000,000 रुपयां पेक्षा अधिक किंमतीचे सामान पुरविले.

हेन्री ड्यूनान्टने म्हटले होते, 'मला अशी एक संघटना हवी आहे जी इंग्लंड वा अन्य कुठल्याच देशापुरती मर्यादित राहणार नाही, तर कोठेही संघर्ष उद्भवताच ती आपोआप कार्याला लागेल.' त्याची इच्छा पुरी झाली.

# भारतीय रेड क्रॉस

रेड क्रॉसची वृत्ती आपल्या भारतात कित्येक शतकांपासून अस्तित्वात आहे. बुद्धाने सर्वांवर प्रेम करायला शिकवले. त्याच्या पूर्वीच्या आणि नंतरच्या कित्येक साधुसंतांनी देखील प्रेमाचा महिमा सांगितला. शिखाचे दहावे गुरू, गोविंदसिंह हे देखील त्यांच्यापैकीच एक होत.


असे सांगतात की एका युद्धात गुरूने आपल्या अनुयायांना अखेरच्या क्षणापर्यंत प्राणपणाने लढा द्यायला सांगितले होते. त्यात असंख्य लोक धारातीर्थी पडले. भाई कन्हैय्या नावाच्या एका साध्या पाणक्याने पखालीतून दोन्ही पक्षाच्या घायाळ लोकांना पाणी पाजण्याचे कार्य आरंभिले. तेव्हा गुरूने त्यास विचारले, 'हे काय करतो आहेस तू ?'

'मी आपल्याच आज्ञा पाळतोय, 'कन्हैय्याने उत्तर दिले, 'आपण म्हटले होते की वाईटाविरुद्ध आपला लढा आहे, व्यक्ती विरुद्ध नाही.'

'बरोबर,' गुरू म्हणाले, 'जगाच्या पाठीवर सर्वत्र माणूस तोच आहे. तू घायाळांना पाणी पाजत आहेसच तर त्यांच्या जखमादेखील बांध.'


सतराव्या शतकातील ही गोष्ट आहे. आता गुरू गोविंदसिंह नाहीत की भाई कन्हैय्या नाही. पण एक दीप उजळला गेला. लोकांसमोर एक उदाहरण घातले गेले. मंदिरांनी आणि धर्मार्थ संस्थांनी गरजू लोकांसाठी मग ते कोणत्या का जातीचे वा धर्माचे असेनात–रुग्णालये बांधण्याकरता पैसा द्यायला सुरुवात केली. तहानेल्या पांथस्थांसाठी पाणपोया बांधण्याचे आणि गरीब मुलांसाठी आश्रम स्थापन करण्याचे कार्य श्रीमंतांनी सुरू केले.

भारतीय रेड क्रॉसने 1920 साली कार्याला आरंभ केला. त्यावर्षी भारतीय कायदे



मंडळाच्या एका कायद्यान्वये रेड क्रॉस सोसायटीची स्थापना करण्यात आली. 1914-18 चे महायुद्ध नुकतेच संपले होते आणि जखमी व रोगयुक्त झालेल्या असंख्य सैनिकांना मदत करण्यासाठी स्वयंसेवकांची अतिशय गरज होती.

भारतीय रेड क्रॉसने स्थापना झाल्यावर सात वर्षांनी पहिल्यांदा कार्याला आरंभ केला. 1927 साली पंजाबमध्ये महापूर आला होता. त्यावेळी पूरग्रस्तांसाठी रेड क्रॉसने पैसे पाठवले.



भारतीय रेड क्रॉसच्या अर्ध्या शतकापूर्वीच्या या इवल्याशा रोपट्याने वाढता वाढता आपली पाळेमुळे खोलवर रुजवली आणि वडासारखा देशभर आपला विस्तार फैलावला. आज त्याच्या 500 च्या वर शाखा, उपशाखा असून मदत कार्य करणारी ती सर्वात मोठी संस्था आहे.

संस्थेचे मुख्य कार्यालय रेड क्रॉस रोड, नवी दिल्ली येथे आहे. तेथे आवारात एका उंच खांबावर रेड क्रॉसचा ध्वज फडकत असतो. प्रत्येक प्रमुख शहरी रेड क्रॉसच्या प्रांतीय शाखा आहेत. तेथील इमारतींवर देखील लाल फुली असलेला पांढरा ध्वज लावलेला असतो.

इमारतींमध्ये अनेक विभाग असतात. एकाविभागात, बसच्या कंडक्टरांना प्रथमोपचाराचे शिक्षण देण्यात येत असते. तर दुसरीकडे अपघातात अवयव गमावून बसलेल्यांचे कृत्रिम अवयवांसाठी अर्ज घेण्यात येत असतात. तिसरीकडे, गरिबांना व्हिटॅमिनच्या गोळया व कपडे वाटण्यात येत असतात.

रेड क्रॉसच्या इमारती नेहमी कामाने गजबजलेल्या असतात. टेलीफोन सारखा चालू असतो. एखाद्या विशिष्ट दिवशी घंटा खणखणते. कुणीतरी घाईघाईने सांगतो, एक रोगी अत्यवस्थ आहे. त्याला लगेच रुग्णालयात हलविणे जरूर आहे. रुग्णवाहक गाडी हवी आहे. रुग्णवाहक गाडीचा अधिकारी पत्ता टिपून घेतो आणि बोलणाऱ्या माणसाला आश्वासन देतो की रुग्णवाहक गाडी लगेच पाठवीत आहोत. थोडयाच वेळात दिलेल्या पत्त्याच्या दिशेने गाडी धावू लागते. तेथे पोचल्यावर गाडीची मागची दारे उघडली जातात, स्ट्रेचर बाहेर काढला जातो आणि रोग्याला त्या स्ट्रेचरवर अलगद निजवून तो परत गाडीत ठेवला जातो. ड्रायव्हर गाडी सुरू करतो, गाडीच्या टपावरचा लाल दिवा लावतो आणि रुग्णवाहक गाडी रुग्णालयाच्या दिशेने परत धावू लागते. अन्य गाडया तिला वाट करून देतात.

रुग्णवाहक गाडी जेव्हा सकाळच्या फेरीनंतर परत येते, तेव्हा दुसरी एक गाडी, रक्त गोळा करणारी एक फिरती गाडी बहुधा रेड क्रॉसच्या इमारतीतून बाहेर पडते. एक डॉक्टर,

एक तंत्रविद आणि एक सामाजिक कार्यकर्ता असे तिघे त्यात असतात. ते एका कॉलेजकडे जात असतात. गरजू रोग्यांना उपयोगी पडावे म्हणून रक्तदान करण्यासाठी स्वेच्छेने पुढे आलेली कित्येक तरुण मुले मुली तेथे असतात. आजाऱ्यांना रक्त चढवण्यासाठी रुग्णालयांना बरेचसे रक्त हवे असते आणि रक्तदानाने एखाद्या अत्यवस्थ रोग्याचे प्राण वाचविणे शक्य होते.

इमारतीत एखाद्या जागी तुम्हाला दोन माणसे कुबडयांच्या आधारे धडपडताना दिसतील. त्यांच्यापैकी एक दूधवाला असतो आणि दुसरा मेकॅनिक असतो. चालत्या आग-गाडीतून पाय निसटून खाली पडल्याने त्याचे पाय तुटलेले असतात. पुन्हा चालण्या फिरण्या-करिता कृत्रिम अवयव बसवून घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी त्यांना दिलेला असतो. पण कृत्रिम अवयव अतिशय महाग असतात. दूधवाल्याला किंवा मेकॅनिकला ते कसे परवडणार ? कृत्रिम अवयव बसवून घेण्यासाठी रेड क्रॉस मदत करते असे त्यांना कळते म्हणून मदत मागण्यासाठी ते येथे आलेले असतात. काही दिवसांनी आधारासाठी लावलेले नवे अवयव बसवून, फोटो काढून घेण्यासाठी ते इमारतीत परत येतात. फोटो घेताना ते स्मित करतात. कारण आता ते स्वतःची काळजी घेण्यास समर्थ झालेले असतात आणि त्यांना कामही मिळालेले असते.

पाकिस्तानशी सशस्त्र लढयाच्या वेळी तर रेड क्रॉसची इमारत नेहमीपेक्षाही अधिक गजबजलेली असायची. रुग्णवाहक गाडया अपघातात सापडलेल्यांना रुग्णालयात घेऊन जायच्या, अपंगांची जा ये चालायची, रक्त गोळा करणाऱ्या तुकडया रक्त गोळा करण्यासाठी बाहेर पडायच्या, शेकडो लोक प्रथमोपचारासाठी आणि घरी करावयाच्या शुश्रूषेच्या मार्ग-दर्शनासाठी यायचे.

त्यावेळी शेकडो स्त्रिया व मुले या इमारतींमधून काम करायची. युद्धकैद्यांना पाठ-वल्या जाणाऱ्या मिठाईचे व इतर भेटवस्तूंचे पॅकिंग करण्यात ते सर्व गुंतलेले असायचे. लढ-णाऱ्या सैनिकांसाठी आपल्या चैनीला थोडीशी काट मारू इच्छिणाऱ्या स्त्री, पुरुष व मुलांनी





त्या भेटवस्तू दान म्हणून दिलेल्या होत्या. मुले मुली अजिबात न कंटाळता गुदामातून पार्सले आणून पॅकिंगच्या खोल्यांमध्ये न्यायची आणि पॅकिंगच्या खोल्यांमधून ट्रकांवर चढवायचीं.

यापैकी काही गठ्ठे तर भारतीय रेड क्रॉसने 22 फेब्रुवारी 1972 ला वाघा सीमेपर्यंत नेले होते. पाकिस्तानच्या रेड क्रॉस पथकाने देखील भेटवस्तूंचे गठ्ठे सीमारेषेपर्यंत आणले होते. वाघा येथे, रेड क्रॉसच्या आंतरराष्ट्रीय कमिटीच्या स्विस प्रतिनिधींसमोर या सर्व पार्सलांची अदलाबदल करण्यात आली. भारतीय रेड क्रॉस दलाने पाकिस्तानात असलेल्या भारतीय युद्ध कैद्यांसाठी भेटवस्तूंची पार्सले आणि पत्रे दिली तर पाकिस्तानी रेडक्रॉसने भारतात असलेल्या पाकिस्तानी युद्ध कैद्यांसाठी पार्सलें व पत्रे दिली.

भारतीय रेड क्रॉसला सर्वात मोठे आवाहन मिळाले ते 1971-72 साली. पूर्व बंगालातून 10,000,000 निर्वासित भारतात आले होते. त्यावेळी अपुरे पोषण झालेल्या

मुलांना व मातांना दूध वाटप करण्यासाठी हजार दुग्ध केंद्रे उघडण्यात आली होती. सत्तावन्न वैद्यकीय पथके निर्वासितांना वैद्यकीय मदत देत होती. बिस्किटे, औषधे, दुधाचे डबे आणि ब्लँकेटे बऱ्याच मोठ्या प्रमाणावर वाटली गेली होती. जगभराच्या रेड क्रॉस सोसायटयांनी सहकार्याच्या हाकेला योग्य तो प्रतिसाद दिला होता.

बांगला देशचे निर्वासित आपल्या घरी परत गेले. पण नैसर्गिक व मानवनिर्मित संकटे कधी संपत नसतात. नित्य नवनवीन समस्या निर्माण होत असतात. दारिद्र्याविरुद्धचा लढा हा तर कधीही न संपणारा लढा आहे आणि म्हणूनच रेड क्रॉसची गरजही कधी न संपणारी आहे.

# रेड क्रॉसचा युवक विभाग

हेन्री ड्यूनान्टची आई जिनिव्हामध्ये अनाथाश्रमासाठी कार्य करीत असे. हेन्री लहान असतानाच तिच्या कार्याविषयी त्याला ओढा वाटू लागला होता. तसेच जगभरातील मुलांनाही आपल्या आईवडिलांचा कित्ता गिरवून रेड क्रॉससाठी कार्य करावेसे वाटू लागले होते.

ती गोष्टी लक्षात घऊन क्लॅरा बार्टनने तिला मदत करू शकतील अशा तरुण तरुणींची एक संघटना तयार केली. कारण एकदा ती म्हणाली होती की तिला धावण्यासाठी, जाण्यासाठी, येण्यासाठी, गोळा करण्यासाठी, खरेदी करण्यासाठी, अनेकवार भेटी देण्यासाठी, त्राण असलेल्या पायांची गरज लागणार आहे. जसजसा काळ लोटला तसतसे यातील सत्य तिला पटले. ती पुढाकार घेऊ शकत होती. मार्गदर्शन करू शकत होती. पण प्रत्यक्ष कार्य करण्यासाठी मात्र निरोगी व उत्साही लोकांची जरूर होती.

ओहायोच्या महापुराच्या वेळी मार्च 1884 मध्ये वॉटरफोर्ड, पेन्सिल्व्हानिया येथील सहा मुलामुलींनी मिळून 51.25 डॉलर्स फंडासाठी जमवले होते. पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मनोरंजनाचा एक कार्यक्रम सादर करून त्यांनी हे पैसे जमवले होते. त्यांनी क्लॅरा बार्टनला

एक पत्र लिहून ते पैसे तिला पाठवले आणि कार्यक्रमाचा वृतांत कळवीत तिला विनंती केली, 'जास्तीत जास्त सदुपयोग होईल अशा कार्यासाठी या पैशांचा विनियोग करावा.' पत्रावर सही होती: छोटे सहा—जो फॅरार वय 12 वर्षे, फलॉरेन्स हॉवे वय 11 वर्षे, मेरी बार्टन वय 11 वर्षे, रीड व्हाइट वय 11 वर्षे, वर्टी एन्सवर्थ वय 10 वर्षे, लॉइड बार्टन वय 7 वर्षे. छोटयांच्या या सदिच्छेने क्लॅरा बार्टन भारावून गेली. शक्य तितक्या अधिक उपयुक्त कार्यासाठी या बहुमूल्य देणगीचा उपयोग करायचे तिने ठरवले.

महिन्यानंतर जोश व्ही. थ्रूपला नदीकाठच्या केव्ह-इन-रॉक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एका निर्जन जागी एक उंच, अशक्त अशी बाई दिसली. तिच्या बरोबर एक लहान मुलगी होती. ती बाई होती मिसेस प्ल्यू. तिचा नवरा तांडेल होता. मागच्या पुराच्या वेळी तो मरण पावला होता. बाईच्या पदरी सहा मुले होती. सर्वात धाकटे मूल तीन वर्षाचे व मोठे पंधरा वर्षांचे फक्त होते. त्यांच्यापाशी दोन घोडे, तीन गायी, काही कोंबडया व डुकरे होती आणि ते सर्व कशीबशी आपली गुजराण करीत होते. पण पुराने गायी, घोडे, डुकरे सारे वाहून नेले. मग वादळ झाले त्यात घर उध्वस्त झाले. उरलेल्या कोंबडया घेऊन प्ल्यू कुटुंबाने एका जुन्या झोपडीचा आश्रय घेतला होता. विपरीत परिस्थितीतही अजिबात न डगमगता ते कुटुब तग धरून राहिले होते.

सहा मुले, क्लॅरा बार्टनच्या मनात विचार आला...आणि तिला छोटे सहा आठवले. वॉटरफोर्डच्या मुलांच्या भेटी विषयी तिने मिसेस प्ल्यूला सांगितले आणि रेड क्रॉसच्या पैशा-तून त्या एक्कावन्न डॉलर्समध्ये आणखी भर घालून त्याचे शंभर डॉलर्स करून ते त्यांना देऊ केले.

त्या पैशांनी मिसेस प्ल्यू व तिच्या मुलांनी एक नवे घर बांधले. त्याला नाव दिले 'छोटे सहा' त्यानंतर कित्येक वर्षेपर्यंत त्या नदीतून प्रवास करणाऱ्यांना नदीकाठच्या उंच-वटयावर प्ल्यू कुटुंब राहात असलेल्या घराबाहेर एक फलक दिसत असे. त्यावर लिहिलेले होते, 'छोटे सहा—रेड क्रॉसचे स्थान.'



लवकरच रेड क्रॉसच्या कार्यकारिणीला वाटू लागले की आपल्या चळवळीत लहान मुलांचाही समावेश करून घ्यायला हवा. म्हणून रेड क्रॉसचा युवक विभाग 1922 साली स्थापन करण्यात आला. याला 'ज्युनियर रेड क्रॉस' असे नाव देण्यात आले.

भारतीय रेड क्रॉसच्या स्थापनेनंतर बरोबर दोन वर्षांनी हा विभाग तयार करण्यात आला. आरोग्य, जीवित व आंतरराष्ट्रीय मैत्री यात वृद्धी करणे हे त्याचे ध्येय होते. मानवतेप्रती व स्वजातीप्रती आपल्या जबाबदाऱ्या काय आहेत याची जाणीव होऊन त्या उचलण्यासाठी तरुणांची मने तयार करण्याचा प्रयत्न करणे हे देखील त्याचे कार्य होते.

आज भारतातील हजारो तरुण 'ज्युनियर रेड क्रॉस'ची शपथ घेतात :

'मी शपथ घेतो की मी स्वत:च्या तसेच इतरांच्या आरोग्याची काळजी घेईन, आजारी व दु:खी लोकांना विशेषत: मुलांना मद ; करीन आणि जगातील अन्य सर्व मुलांना माझे मित्र समजेन.'

या शपथेला अनुसरून दिल्लीचा युवक विभाग उन्हाळयाच्या सुट्टीत शिबिरे भरवून खेडयातील रस्ते तयार करतो, स्वच्छता मोहीम आखतो, सांडपाण्यासाठी खळगे खणतो आणि खेडयातील रस्ते झाडून काढतो. याच मनोवृत्तीने पंजाबचा युवक विभाग गरीब विद्यार्थ्यांसाठी फंड जमवितो आणि चंडीगडजवळ साकेत येथे असलेल्या अपंग मुलांच्या रुग्णालयाला सहाय्य करतो.


तरुणांनी केलेली डोळयात भरण्याजोगी कामगिरी म्हणजे ऑस्ट्रेलियन रेड क्रॉसच्या युवक विभागाची कामगिरी होय. व्हिएतनाम मधील प्रदीर्घ व भीषण युद्धामुळे हजारो मुले घरादाराला मुकली व अनाथ झाली. आस्ट्रेलियन तरुणांनी मोठया उत्साहाने फंड जमविला. त्यातून दोन ते चौदा वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी असलेल्या कॅन थो अनाथाश्रमाला मदत करण्यात येते.

अशा तऱ्हेने रेड क्रॉसचे तरुण कार्यकर्ते जगभरच्या मुलांकडे लक्ष देतात. ती मुले बहुधा त्यांच्याच वयाची असतात. पण त्यांच्या इतकी नशीबवान नसतात. राष्ट्रीय मतभद किती निरर्थक आहेत ते रेड क्रॉसचे तरूण ओळखतात. म्हणून मानवाला आवश्यक अस-





णाऱ्या एकात्मतेवर त्यांचा भर असतो. विभिन्न देशांविषयी ते व्याख्याने आयोजित करतात, चित्रपट आणि स्लाइड्स दाखवतात आणि इतरत्र असलेल्या रेड क्रॉसच्या तरुणांशी चित्र संग्रहांची अदलाबदल करतात. आंतरराष्ट्रीय अभ्यास मंडळास हजर राहण्यासाठी कधी आपले तरुण परदेशी जातात तर कधी परदेशांतील तरुण भारतात येतात. त्यांची दाट मैत्री होते, जग आणखी परस्परांच्या जवळ येते आणि ड्यूनान्टचे ध्येय अमर होते.



# ड्यूनान्टचा मृत्यू

स्वित्झर्लंडमधील हीडेन या छोटयाशा खेडयात एक तरुण पत्रकार मजेत सुट्टी घालवीत असताना एके दिवशी त्याला चंदेरी केसांचा एक देखणा म्हातारा माणूस दिसला. उत्सुकतेने त्याने त्याच्याविषयीची माहिती त्याला विचारायला सुरुवात केली आणि त्यावेळी त्याला समजले की तो माणूस म्हणजे दुसरा कोणी नसून रेड क्रॉसचा संस्थापक हेन्री जीन ड्यूनान्टच आहे. उत्तेजित होऊन त्याने आपला हा शोध वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केला आणि तेव्हा कुठे जगातील लोकांना समजले की ज्याला आपण फार पूर्वी मृत झाल्याचे समजत होतो तो माणूस अजून जिवंत आहे. पण दारिद्र्यात जिणे कंठीत आहे.

तीस वर्षे ड्यूनान्ट लोकांच्या नजरेपासून दूर राहिला होता. रेड क्रॉससाठी आपला सारा वेळ आणि पैसा खर्ची घालणारा ड्यूनान्ट रेड क्रॉसच्या स्थापनेनंतर कफल्लक झाला होता. धंदा पूर्वीच घसरणीला लागला होता. पण त्याने त्याकडे दुर्लक्ष केले होते. अखेरीस 1867 साली त्याचे दिवाळे वाजले. या गोष्टीचा आपल्या आवडत्या ध्येयावर विपरीत परिणाम होऊ नये म्हणून ड्यूनान्टने कमिटीचा राजीनामा दिला होता. एव्हाना कमिटीत समर्थ



हेन्री डयूनान्ट

आणि मेहनती कार्यकर्त्यांचा भरणा झाला होता. त्यामुळे त्यांना ड्यूनान्टची गरज उरली नव्हती. त्यांनी त्याचे स्वप्न प्रत्यक्षात आणले आणि जग ड्यूनान्टला विसरून गेले.

या सर्व गोष्टीला जाहीर प्रसिद्धी मिळाल्यानंतर ड्यूनान्टवर पत्रांचा पाऊस पडला. अनेकांनी त्याला पैसा व अन्य मदत देऊ केली. पण त्याने काहीही घेण्यास ठाम नकार दिला. आपल्या साध्यासुध्या जीवनाची त्याला आता सवय झाली होती. कीर्तीला त्याच्या लेखी फारसा अर्थ उरला नव्हता.

तरी पण त्याला कीर्तीपासून दूर पळता आले नाही. शांततेसाठी असलेले नोबेल पारितोषिक 1901 साली पहिल्यांदा त्याला व फ्रेंच शांतता संघटनेचा संस्थापक फ्रेडरिक पास्सी याला विभागून देण्यात आले. पारितोषिकाची रक्कम ड्यूनान्टने आपल्या आवडत्या कार्याला देऊन टाकली आणि तो पूर्वीसारखाच साधेपणाने राहिला. हीडेनचा शांत एकांत परिसर त्याने मृत्यूपर्यंत सोडला नाही.

ड्यूनान्ट 1910 साली, म्हणजे रेड क्रॉसच्या युवक विभागाची स्थापना होण्याच्या बारा वर्षे अगोदर मरण पावला. आपल्या स्मृतीचे हे भव्य स्मारक पहावयास तो जिवंत राहिला नाही. पण आपण सुरू केलेली चळवळ फोफावल्याचे आणि जगभर पसरल्याचे मात्र त्याने स्वत:च्या डोळ्यांनी पाहिले.

ड्यूनान्टच्या आदर्शांनी आज जगातील लाखो लोकांना एकत्र बांधून ठेवले आहे. मानवाच्या इतिहासात रेड क्रॉसच्या बंधुत्वाला तोड नाही.

8 मे रोजी जग ड्यूनान्टचे स्मरण करते. संस्थापकाच्या जयंती प्रीत्यर्थ विश्व रेड क्रॉस दिवस साजरा करण्यात येतो. जगाच्या विभिन्न भागातील सभासद एकत्र जमतात आणि त्याचे कार्य पुढे चालू ठेवण्याचा निर्धार करतात. रेड क्रॉसचे ध्वज हवेत उंच फडकतात आणि जाहीर करतात—'सर्व माणसे भाऊ भाऊ आहेत.'

म. सं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. ११२५ दिनांक ....
विषय किशोर क्र. ६.२१
BVBK-0401127